





दैनिक **अक्षराज** अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : २९२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०३ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# मान्सून लाबंला राज्याच्या या भागावर दुष्काळाचे सावट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, पुणे :** राज्यासह संपूर्ण देशातील शेतकरी मान्सूनच्या आगमनाकडे डोळे लावून बसले आहेत. मात्र अद्यापही मान्सून केरळमध्ये दाखल झालेला नाही. त्यामुळे आता मान्सूनचे महाराष्ट्रातील आगमनही लांबणार आहे. तसेच यंदा राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे, त्यामुळे राज्याच्या काही भागावर दुष्काळाचे सावट निर्माण झाले आहे. हवामान विभागाकडून याबाबत माहिती देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.




**विदर्भात पावसाचे प्रमाण कमी राहणार...**

नागपूर हवामान विभागाचे शास्त्रज्ञ प्रवीण कुमार यांनी सांगितले की, ‘विदर्भात या वर्षी पावसाचे प्रमाण कमी राहणार आहे. यंदा ९२ ते ९४ टक्के पर्यंत पाऊस पडण्याचा अंदाज आहे. जुलै-ऑगस्ट महिन्यात अलनिनोचा प्रभाव मोठ्या प्रमाणात राहणार असल्याने पावसाचे प्रमाण कमी राहणार आहे. विदर्भात मान्सून १० ते १५ जून पर्यंत दाखल होण्याचा अंदाज आहे. यावर्षी कमी पाऊस पडणार असल्याने शेती सह अनेक क्षेत्रावर त्याचा प्रभाव पडणार आहे.

**शेतीला मोठा फटका बसण्याची शक्यता**

प्रवीण कुमार यांनी पुढे बोलताना सांगितले की, लॉन्ग रेंज फोरकास्ट हवामान विभागाने जारी केला त्यानुसार संपूर्ण भारतात मान्सून कमजोर राहणार आहे. सरासरी ९२% पाऊस पडणार आहे. विदर्भाच्या जास्तीत जास्त क्षेत्रामध्ये पाऊस सामान्य पेक्षा कमी होण्याचे शक्यता आहे. अजून पर्यंत केरळ पर्यंत मान्सून पोहोचला नसल्याने सध्या सांगता येणार नाही मात्र विदर्भात मान्सूनची स्थिती ही सामान्य आणि कमजोर राहण्याची शक्यता आहे. याचा मोठा फटका शेतीला बसू शकतो.

**महाराष्ट्रात १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही**

महाराष्ट्रात १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही. अरबी समुद्रात मॉन्सून सक्रिय होण्याची कुठली चिन्ह नाहीत, त्यामुळे चिंता वाढली आहे. अरबी समुद्रात नैऋत्य मोसमी वाऱ्यांसाठी अनुकूल झालेली परिस्थिती पुन्हा बदलली आहे, त्यामुळे मान्सून लांबला आहे. केरळला मान्सून पोहोचल्यानंतर हवामानातील बदल, वाऱ्याचा वेग आणि समुद्रातील स्थिती यावर मान्सूनची वाटचाल अवलंबून असणार आहे. त्यामुळे दमदार आणि चांगला पाऊस झाल्याशिवाय शेतकर्यांनी पेरणी करू नये असा सल्ला देण्यात आला आहे.

## शिट्टी वाजवून पावसाची चाहूल देणारा ‘नवरंग’ ‘इंडियन पिट्टा’ लोणार सरोवरात दाखल



**अक्षराज : उध्दव आटोळे**

**दि.०२, लोणार (बुलढाणा) :** नवरंग या पक्षाचे लोणार सरोवर येथे झाले आगमन हिरवा, निळा, पिवळा, काळा ,पांढरा , केशरी आणि लाल अशा विविध रंगांची उधळण त्याच्या अंगावर दिसून येते शरीरावर नऊ रंगाच्या छटा असल्यामुळे त्याला नवरंग असे नाव पडले आहे पावसाच्या आगमनाची चाहूल देणारा ‘नवरंग’ अर्थात ‘इंडियन पिट्टा’ हा आकर्षक स्थलांतरित पक्षी यावर्षी लोणार सरोवरात दाखल झाला आहे.

‘मी लोणारकर’ टीम चे पक्षी निरीक्षक उमेश चिपडे व मानद वन्यजीव रक्षक सचिन कापुरे यांनी या पक्षाची छटा लोणार सरोवरात प्रथमच कॅमेरा मद्ये टिपली आहे. हा पक्षी प्रामुख्याने झाडा जुडपाच्या परिसरात जमिनीवर किंवा कमी उंचीच्या झाडावर दिसतो. त्याची वैशिष्ट्यपूर्ण नोंद म्हणजे सुरांची शिट्टी पक्षी प्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरते प्रजनन काळात नर पक्षी मादीला आकर्षित करण्यासाठी विशिष्ट स्वर काढतो.

# विधानपरिषद निवडणूक : कॉंग्रेस व भाजपच्या उमेदवारांचे नामांकन दाखल

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** विदर्भातील हायव्होल्टेज लढतींपैकी एक असलेल्या चंद्रपूर-वर्धा-गडचिरोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधानपरिषद निवडणुकीचे चित्र आता स्पष्ट झाले आहे. आज भाजप आणि काँग्रेस या दोन्ही प्रमुख पक्षांच्या उमदवारांनी त्यांचे नामांकन अर्ज दाखल केले. मात्र, या अर्ज सादरीकरणाच्या वेळी झालेल्या राजकीय घडामोडींनी आणि एका मोठ्या नेत्याच्या अनुपस्थितीने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे.

चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयात आज राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. महायुती आणि महाविकास आघाडीच्या वतीने जोरदार शक्तिप्रदर्शन करण्यात आले. भाजपकडून उद्योगपती



आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते अरुण लखानी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी त्यांच्यासोबत राज्याचे गृहराज्यमंत्री पंकज भोयर, पालकमंत्री डॉ. अशोक वुईके आणि स्थानिक आमदार, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तर दुसरीकडे, महाविकास आघाडीतर्फे काँग्रेसचे उमेदवार शैलेश अग्रवाल यांनी वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज सादर केला.

मात्र, आजच्या या संपूर्ण प्रक्रियेमध्ये भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची अनुपस्थिती सर्वात मोठा चर्चेचा विषय ठरली. त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यात होत असलेल्या या अत्यंत महत्त्वाच्या निवडणुकीच्या वेळी त्यांनी लावलेली दांडी राजकीय वर्तुळात अनेक चर्चांना उधाण देऊन गेली आहे. या अनुपस्थितीमागे अंतर्गत नाराजी आहे की काही वेगळे कारण, याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत.

अर्ज दाखल केल्यानंतर दोन्ही बाजूंच्या उमेदवारांनी आणि नेत्यांनी विजयाचा प्रचंड आत्मविश्वास व्यक्त केला असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारांचा कौल आपल्याच बाजूने असल्याचा दावा केला आहे.

## सूरतमध्ये महाराष्ट्राच्या दोन एसटी बसचा भीषण अपघात, सहा जणांचा जागीच मृत्यू

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.०२, सूरत :** गुजरातच्या सूरतमध्ये दोन एसटी बसचा भीषण अपघात झाला आहे. दोन्ही एसटी बस या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या म्हणजेच महाराष्ट्राच्या एसटी बस होत्या. या अपघातात आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. संबंधित घटना ही पाच ते सव्वा पाच वाजेच्या सुमारास घडली आहे. सूरतच्या बारडोली तालुक्यातील उवा गांव येथे अपघाताची घटना घडली आहे. दोन्ही बस समोरासमोर आल्याने ही अपघाताची घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे. या अपघातात दोन्ही बसचे मोठे नुकसान झाले. या अपघातात एका बसचा पुढचा भाग पूर्णपणे उद्धवस्त झाला तर दुसरी बसही थेट पलटी झाली. पलटी झाल्यानंतर या बसला भीषण आग लागली. यामुळे अनेकांचा जीव गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेत आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाला आहे.

अपघातग्रस्त बसपैकी एक बस ही धुळे-सूरत अशी होती. ही बस धुळेहून नंदूरबार नवापूर मार्गाने सूरत येत होती. तर दुसरी बस ही गुजरातहून महाराष्ट्राच्या दिशेला जात होती. चालकाचं नियंत्रण सुटल्याने एक बस ही डिव्हायडरला जावून धडकली. त्यानंतर समोरुन येणारी दुसरी बस ही बाजूला जात होती. पण बाजूला जात असताना ती पलटी झाली. पलटी होताच तिला आग लागल्याची माहिती आहे. अवघ्या क्षणार्धात इथे हाहा:कार उडाला.

**बचावकार्य युद्ध पातळीवर सुरु !**

घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशामक दलाकडून आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न शर्थीने सुरु होते. बसला आग लागल्यामुळे गाडीत अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यात अडचणी येत असल्याची माहिती आहे. तसेच जखमींना तातडीने बारडोली येथील रुग्णालयात नेण्यात आल्याचीदेखील माहिती आहे. सूरत हे शहर गुजरातमध्ये असलं तरी इथे मराठी नागरिकांची मोठी संख्या आहे. संबंधित परिसर हा खान्देशाला लागून आहे. यामुळे खान्देशातील लाखो नागरीक या भागात स्थलांतरीत झाले आहेत. ते वर्षानुवर्षे इथे राहत आहेत. अपघातग्रस्त बस नेमक्या कुठल्या आगारच्या आहेत ते अद्याप समजू शकलेलं नाही. पण या घटनेमुळे महाराष्ट्रातही शोककळा पसरली आहे. या अपघातातील जखमी आणि मृतकांची माहिती अद्याप समजू शकलेली नाही. तसेच बचाव पथकाकडून बचावकार्य सुरु असल्याची माहिती आहे.

# महात्मा फुले कृषि विद्यापीठात आंबा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

## शेती शाश्वत करण्यासाठी आंबा महत्त्वाचे फळपीक - कुलगुरू डॉ.विलास खर्चे

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०२, राहुरी विद्यापीठ :** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागामार्फत फळ प्रक्रियेवर मोठ्या प्रमाणावर प्रशिक्षणे घेण्यात येतात. या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसाय निर्माण करून उद्योजक होणार्या लोकांच्या यशोगाथा तयार करायला हव्यात. आपला देश शेतीप्रधान देश आहे. आपला महाराष्ट्र उद्यानविद्येमध्ये अग्रेसर असून आपली शेती शाश्वत करण्यासाठी शेतीला फळप्रक्रियेची जोड देणे आवश्यक आहे. या दृष्टीने शेती शाश्वत करण्यासाठी आंबा फळपीक महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागांतर्गत पाच दिवसीय आंबा फळ प्रक्रिया प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ.विलास खर्चे बोलत होते. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे, अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. विक्रम कड व प्रक्रिया अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे उपस्थित होते.

यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे आपल्या मार्गदर्शनामध्ये म्हणाले की सध्या प्रक्रिया उद्योगाला मोठे महत्त्व आले आहे. भविष्यात उद्योजक बनण्यासाठी सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी या प्रशिक्षणामध्ये शिकवण्यात येणार्या सर्व विषयांचे ज्ञान आत्मसात करा. या प्रशिक्षणामध्ये मिळालेल्या ज्ञानाने इतर लोकांना प्रोत्साहित करा त्यामुळे भविष्यात आंबा पिकामध्ये चांगले उद्योजक निर्माण होतील असे यावेळी ते म्हणाले. डॉ.सातापा खरबडे मार्गदर्शन करताना म्हणाले की फळ प्रक्रिया प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे असून सध्याच्या परिस्थितीमध्ये शेतकर्यांना फळ प्रक्रिया उद्योग एक



उत्तम शेतीपुरक व्यवसाय ठरू शकतो. हे ५ दिवसीय प्रशिक्षण निश्चितच शेतीपूरक व्यवसायासाठी महत्त्वाचे ठरेल असे यावेळी ते म्हणाले. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये प्रशिक्षणार्थींना आंबा प्रक्रियायुक्त पदार्थांची निर्मिती ज्यामध्ये आंबा गर साठवणे, कैरी लोणचे व पन्हे, आंबा सरबत, सिरप, स्कॅश, आंबा पावडर, आमचूर, जॅम तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्याचबरोबर अन्न सुरक्षितता व मानके कायद्याची माहिती, प्रक्रिया उद्योगाची नोंदणी, उद्योगासाठी लागणारी मशिनरी व त्यांची देखभाल, पदार्थांचे पॅकेजिंग आणि मार्केटिंग, प्रक्रिया उद्योगासाठी शासनाच्या कर्ज योजना, अनुदान यासंबंधीची माहिती दिली जाणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विक्रम कड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल घुगे यांनी तर आभार गोरक्षनाथ चौधरी यांनी मानले. यावेळी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, अधिकारी व प्रशिक्षणासाठी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून आलेले २२ पेक्षा जास्त प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## एअर फोर्समधील ४१ वर्षीय सार्जंटचा दुर्दैवी मृत्यू

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.०२, पुणे :** खडकवासला येथील कालव्यात मित्रांसोबत पोहण्यासाठी गेलेल्या भारतीय हवाई दलातील एका सार्जंटचा बुडून मृत्यू झाला. सोमवारी सायंकाळी त्यांचा मृतदेह नांदेड फाटा परिसरात आढळून आला. या घटनेमुळे ‘एनडीए’ परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

राजेशकुमार वर्मा (वय ३५) असे मृत सार्जंटचे नाव आहे. वर्मा यांची नियुक्ती राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) येथील एअर फोर्स विभागात होती. रविवारी ते ‘एनडीए’मधील काही सहकाऱ्यांसोबत खडकवासला येथील यशवंतराव महाविद्यालयाजवळील कालव्यात पोहण्यासाठी गेले होते. पोहत असताना पाण्याच्या खोलीचा आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने वर्मा पाण्यात बुडाले. घटनेची माहिती मिळताच ‘पीएमआरडीए’ अग्निशामक दल, मुळशी व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी; तसेच ‘एनडीए’चे जवान घटनास्थळी दाखल झाले. विविध पथकांनी कालवा परिसरात व्यापक शोधमोहीम राबविली. सोमवारी सायंकाळी चारच्या सुमारास नांदेड फाटा परिसरात वर्मा यांचा मृतदेह आढळला. या प्रकरणी नांदेड सिटी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.




## लोकनेते गोपीनाथ मुंडे

कोणताही राजकीय वारसा नसताना, स्वकर्तृत्वाने राजकारणाचे शिखर गाठणारे नेते भारतीय राजकारणात हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच असतील यात लोकनेते म्हटले जाणारे एकमेव नेते म्हणजे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब. आज ३ जून, आज साहेबांची पुण्यतिथी आजच्याच दिवशी म्हणजे ३ जून २०१४ रोजी साहेब आपल्या लाखो अनुयायांना पोरके करून निघून गेले. १२ डिसेंबर १९४९ रोजी बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथरा गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जमलेल्या गोपीनाथ मुंडे यांच्या वडिलांचे नाव पांडुरंगराव आणि आईचे नाव लिंबाबाई मुंडे असे होते. १९६९ सालीच गोपीनाथ मुंडे यांचे पितृछत्र हरपले. वडीलबंधु पंडितअण्णा यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते आंबेजोगाई येथे आले तिथेच त्यांच्यातील नेतृत्व समाजासमोर आले. महाविद्यालयीन निवडणुकीद्वारे त्यांचे नेतृत्व उदयास आले. याच सुमारास त्यांची ओळख भाजप नेते प्रमोद महाजनांशी झाली आणि त्यांच्यात मैत्री निर्माण झाली ही मैत्री पूढे पन्नास वर्षे टिकली. महाजनांनी मुंडे यांच्यातील नेतृत्वगुण हेरून त्यांना अखील भारतीय विद्यार्थी परिषदेशी जोडले. पुढे या जोडीने महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अनेक आंदोलनात एकत्र भाग घेतला. दोघेही जनसंघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. आणीबाणीला विरोध केल्याने गोपीनाथ मुंडे यांना कारावास भोगावा लागला. १९७८ साली मुंडे साहेब जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे १९८० साली ते रेणापूर मतदारसंघातून पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. या दरम्यान त्यांनी भाजपला घराघरात पोहचवण्याचे काम केले. भाजप हा ब्राह्मणांचा पक्ष आहे. ही ओळख खोडून काढण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात 'म ाधव' चा प्रयोग केला आणि भाजपला बहुजनांचा पक्ष बनवला. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रयत्नांमुळेच बहुजनवर्ग भाजपकडे वळला. गोपीनाथ मुंडे हे उत्कृष्ट वक्ते होते. आपल्या धारधार वक्तृत्वाने त्यांनी सभा गाजवायला सुरवात केली. विधिमंडळात असो की विधिमंडळाबाहेर सार्वजनिक सभेत असो मुंडे साहेब आपल्या वक्तृत्वाने श्रोत्यांची मने जिंकत असत. विरोधी पक्षात असूनही महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय नेत्यांत त्यांची गणना होऊ लागली. विरोधी पक्षनेते या नात्याने ते सत्ताधाऱ्यांवर तुटून पडायचे. १९९१ ते १९९५ या काळात ते विरोधी पक्षनेते असताना सत्ताधारी काँग्रेसपक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले होते. १९९५ साली त्यांनी महाराष्ट्रभर दौरे करून जनमत तयार केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच १९९५ साली राज्यात युतीचे सरकार आले. या सरकारमध्ये ते उपमुख्यमंत्री बनले शिवाय गृहमंत्रीपदाची जबाबदारी देखील त्यांचावरच होती. गृहमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. गृहमंत्री असताना त्यांनी गुन्हेगारांविरुद्ध धडाकेबाज कारवाई केली. पोलिसांना अधिकार दिले. एन्काऊंटर हा शब्द तेंव्हाच रूढ झाला. मुंबईतून गँगवार हद्दपार करण्यासाठी त्यांनी पोलिसांना मोकळीक दिली त्यांच्यामुळेच मुंबईतील गुन्हेगारी टोळ्या नष्ट झाल्या तर काहींनी देशाबाहेर पलायन केले. गोपीनाथ मुंडे हे कुशल प्रशासक तसेच समन्वयक देखील होते भाजप सेना युतीत तणाव निर्माण झाला की ते निवळण्याचे काम गोपीनाथ मुंडेच करायचे. त्यांचे आणि बाळासाहेबांचे खूप जवळचे संबंध होते. पुढे युतीची महायुती करण्याचे कामही त्यांनी केले त्यांच्यामुळेच राजू शेट्टी, रामदास आठवले, महादेव जानकर यासारखे नेते भाजपशी जुळले. २०१४ साली महाराष्ट्रात आणि केंद्रात सत्ता आणण्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली. नरेंद्र मोदींच्या पहिल्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री बनले. गोपीनाथ मुंडे हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व होते. ते भाजपचे असूनही विरोधी पक्षातील नेत्यांशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते. विलासराव देशमुख आणि छगन भुजबळ यांच्याशी त्यांचे असलेले मैत्रीचे संबंध सर्वश्रुत आहे. २०१४ साली ते जेंव्हा केंद्रात कॅबिनेट मंत्री बनले तेंव्हा संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला मात्र हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. ३ जून २०१४ रोजी एका अपघातात त्यांचे निधन झाले आणि संपूर्ण महाराष्ट्र शोक सागरात बुडाला. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना पुण्यतिथीदिनी विनम्र अभिवादन !

**– श्याम ठाणेदार**

# जनतेचा पैसा अपात्र बहिणींना का वाटला ?

लाडकी बहीण योजनेअंतर्गत दरमहा महिलांना दिल्या जाणाऱ्या धनामुळे सरकारी तिजोरीवर प्रचंड प्रमाणात ताण येत आहे. तो ताण कमी करण्यासाठी सरकारने ज्या महिलांच्या खात्यात दरमहा पैसे येत आहेत अशांना इकेवायसी करण्याचे आवाहन केले. ज्यांची मिळकत अधिक होती अशा महिलांनी इकेवायसी करणे टाळले.

शिवाय योजनेअंतर्गत घालून दिलेल्या अटीनुसार छाननी केली असता अपात्र ठरलेल्या ८० लक्ष बहिणींना दरमहा पैसे येणे बंद होणार आहे. लोकसभा निवडणुकीत मिळालेल्या अपयशाचा परिणाम विधानसभा निवडणुकीवर व्हायला नको म्हणून निवडणुकीच्या तोंडावर सरकारने घिसाडघाईने ही योजना आणली. मागील दीड वर्षाहून अधिक काळ सुरु असलेल्या या योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवर मोठ्या प्रमाणात भार पडत आहे. योजना मध्येच बंद करून सरकारची नाचक्की व्हायला नको म्हणून आजतागायत ही योजना सुरु ठेवण्यात आली आहे; मात्र ही योजना सुरु ठेवण्यासाठी अन्य अनेक योजनांचा निधी सरकारने कमी केल्याचे बोलले जाते. सणासुदीच्या निमित्ताने दिला जाणारा आनंदाचा शिधा तर लुप्तच झाला आहे. रेवडी संस्कृतीला पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमीच विरोध करत असतात. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' म्हणजे रेवडीचे वाटप नाहीतर काय आहे असाही प्रश्न त्यावेळी विरोधकांकडून करण्यात आला होता. लाडकी




बहीण योजना सुरु केली तेव्हा राज्यावर ७ लाख कोटी रुपयांचे कर्ज होते आज हेच कर्ज ११ लाख कोटींच्या घरात गेले आहे. हा आकडा महाराष्ट्रापेक्षा आकाराने आणि लोकसंख्येने अधिक असलेल्या राज्यांवरील कर्जापेक्षा कितीतरी अधिक आहे. यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस होणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे ज्यामुळे अनेक भागांत दुष्काळ पडण्याची दाट शक्यता आहे. थोड्या थोडक्या कर्जासाठी शेतकरी मृत्यूला कवटाळत आहेत. बेरोजगारीचा प्रश्न आ वासून उभा आहे, अशा परिस्थितीत केवळ सरकारची इभ्रत राखण्यासाठी राज्यावरील कर्जाचा आकडा का वाढवला जात आहे असा प्रश्न आज अनेकांना पडला आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ महायुती सरकारला विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मोठ्या प्रमाणात मिळाला असे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे. या योजनेअंतर्गत जो पैसा राज्यातील माता भगिनींना प्रतिमाह दिला जातो तो महायुतीतील घटक पक्षांच्या तिजोरीतून नव्हे, तर सरकारी खजिन्यातून दिला जातो. सर्वसामान्य नागरिक दिवसभर राब राब राबून महिन्याला जे वेतन कमावतो त्या वेतनातून कररूपाने पैसा सरकारी खजिन्यात जमा होत असतो. या जनतेच्या घामातुन आलेल्या पैशाचा विनियोग योग्य रीतीनेच व्हायला हवा. त्यासाठी योग्य नियोजन करण्याचे काम सरकारचे असते. मात्र माझी लाडकी बहीण योजना अमलात आणताना सरकारमधील घटक पक्षांनी केवळ निवडणूक डोळ्यासमोर ठेवून हा पैसा कोणतीही छाननी न करता मुक्त हस्ताने वाटला. ८० लाखांहून अधिक अपात्र महिलांना मागिल दीड वर्षांपासून सरकार पैसे वाटत आहे. ज्यामुळे सरकारला जो हजारो कोटी रुपयांचा फटका बसला आहे तो उत्तरदायी मंत्री महोदयांनी आणि सरकारी अधिकाऱ्यांनी आपल्या खिशातून द्यायला नको का ? या योजनेसाठी सरकारने जे निकष ठरवले होते त्या निकषात बसणाऱ्या महिलांनीच खरेतर योजनेसाठी अर्ज करणे अपेक्षित होते; मात्र सरकारी सेवेत गलेलठ्ठ वेतन घेणाऱ्या, घरात मोलकरीण ठेवणाऱ्या, चारचाकी गाडीतून फिरणाऱ्या महिलांनीही या योजने अंतर्गत अर्ज करून या योजनेचा गैरफायदा घेतला. काही ठिकाणी तर पुरुषांनी महिलांच्या नावाने अर्ज दाखल करून या योजनेचा पैसे लाटला. ही केवळ सरकारचीच फसवणूक नसून देशाच्या विकासासाठी आपल्या मिळकतीमधून कररूपाने सरकारला धन देणाऱ्या प्रत्येक साम ान्य नागरिकांचीही फसवणूक आहे, त्यामुळे अशा महाभागांवर कारवाई करून त्यांच्याकडून दंडासहित रक्कम वसूल करायला हवी. सरकारला ते जमत नसेल तर सरकारमधील घटक पक्षांनी केलेल्या चुकीचे प्रायश्चित्त घेऊन आजतागायत वाया गेलेला जनतेच्या घामाचा पैसा पक्षनिधीच्या रकमेतून सरकारी तिजोरीत जमा करावा.

# षटकारांचा बादशहा..टीम इंडियाचे वैंभव

अद्भुत, विलक्षण आणि अलौकिक अशा कितीतरी उपमा दिल्या तरी त्याला कमीच पडतील.'मास्टर-ब्लास्टर' सचिन तेंडुलकर, 'सिक्सर किंग' युवराज सिंग आणि 'हिटमॅन' रोहित शर्मानंतर टीम इंडियाचा धडाका सुरु ठेवण्याची परंपरा कोण सांभाळणार असा प्रश्न आम्हा क्रिकेटशौकिनांना पडला होता. पण त्या प्रश्नाचे धडाकेबाज उत्तर मिळाले आहे ते १५ वर्षीय 'सिक्सर किंग' वैभव सूर्यवंशीच्या रूपाने नावाप्रमाणेच खरेच हा छोकरा सूर्यवंशाप्रमाणे क्रिकेट जगताला तोंडात बोटे घालायला लावतोय. 'लिटल मास्टर' सुनील गावसकरांपासून थेट 'गॉड ऑफ क्रिकेट' म्हणून भारतीय क्रिकेटशौकीन ज्याचा 'उदो उदो' करतात त्या सचिन तेंडुलकरांपर्यंत सरावानेच वैभवच्या तुफानी खेळाचे मनापासून कौतुक केलंय. 'मिस्टर ३६०' म्हणून झटपट क्रिकेटमध्ये ज्याला ओळखले जाते त्या दक्षिण आफ्रिकेच्या ए बी डिव्हिलियर्स यानेही सूर्यवंशीचा खेळ खरेच भन्नाट आहे. मात्र त्याने कसोटीत असा खेळ करवून दाखवावा असे मनोगत नुकतेच व्यक्त केले आहे.

डावखुऱ्या सूर्यवंशीने यंदाच्या आयपीएल स्पर्धेत जगातील भल्या-भल्या गोलंदाजांना आपल्या बॅटचे पाणी दाखवत नामोहरम केले आहे. समोर कोण गोलंदाज आहे याची तमा न बाळगता वैभवने त्यांचे चेंडू सीमारेषेपार हवेत टोलावण्याचा पराक्रम केला आहे. वैभवने सर्वात मोठा विश्वविक्रम केला तो एकाच आयपीएल हंगामात सर्वाधिक षटकार ठोकण्याचा हा विक्रम क्रिकेटमध्ये 'युनिव्हर्स बॉस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वेस्ट इंडिजच्या ख्रिस गेलच्या नावावर होता. २७ मार्च २०११ रोजी वैभवचा बिहारमध्ये जन्म झाला. सर्वात कमी वयात आयपीएलमध्ये स्थान मि ळालेला तो खेळाडू आहे. त्याने जानेवारी २०२४मध्ये बिहारसाठी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. त्यावेळी त्याचं वय १२ वर्ष २८४ दिवस होतं. त्याने डेब्यूच्यावेळी विजय हजारे ट्रॉफी २०२४-२५ मध्ये बडोदाच्या विरोधात ४२ चेंडूत ७१ धावा ठोकल्या होत्या. तो लिस्ट-ए मध्ये अर्धशतक ठोकणारा सर्वात कमी वयातील भारतीय खेळाडू आहे. बिहारच्या सम स्तीपूरच्या वैभवला चार वर्षांचा असल्यापासून क्रिकेट खेळण्याचं वेड लागलं होतं. त्याचे वडील संजीव यांनी त्याच्यासाठी घराच्या मागे एक ग्राऊंड तयार केलं होतं. त्याला वयाच्या नवव्या वर्षी समस्तीपुरच्या एका क्रिकेट अकादमीत दाखल केलं. त्यानंतर वैभवने मागे वळून पाहिलंच नाही. त्याने या मैदानातही वरिष्ठ गोलंदाजांची चांगलीच चंपी केली होती.

वैभव सूर्यवंशीने अंडर-१९ विश्वचषकात सर्वाधिक षटकारांचा विक्रम केला आहे. या साम न्यापूर्वी, वैभव सूर्यवंशीने २०२६ च्या अंडर १९ विश्वचषकात १६ षटकार मारले होते आणि एका १९ वर्षांखालील विश्वचषक आवृत्तीत सर्वाधिक षटकार म ारणारा तो इतिहासातील दुसरा खेळाडू बनला होता. पण अंतिम सामन्यातील खेळीत त्याने १३ षटकार लगावत एका खेळीत सर्वाधिक षटकार लगावण्याचा वर्ल्ड रेकॉर्ड त्याने केला आहे. एका आयपीएल सीझनमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम वैभवने आधीच आपल्या नावावर केला आहे त्याने सात षटकार मारत त्यामध्ये भर घालत ७२ षटकारांची नोंद केली आहे.







याआधी 'युनिव्हर्स बॉस' ख्रिस गेल याच्या नावावर ५९ षटकारांचा हा विक्रम होता. आताच्या वर्षी वैभव हा 'षटकार किंग' असून त्याचा हा विक्रम कोण मोडेल सांगू शकत नाही. गुजरात टायटन्सविरुद्धच्या सामन्याम ध्ये वैभवने ४७ चेंडूत ९६ धावांची खेळी केली, यामध्ये त्याने ७ षटकार आणि ८ चौकार मारले. या खेळीसह वैभवने आयपीएलच्या इतिहासामधील एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला. आयपीएलमध्ये १००० धावांचा टप्पा सर्वात वेगाने पार करणारा तो पहिला खेळाडू ठरला. वैभव याने ४४० चेंडूंमध्ये १००० धावा पूर्ण केल्या आहेत. हा विक्रम आधी आंद्रे रसेल याच्या नावावर होता. रसेलने ५४५ चेंडूत ही कामगिरी केली होती. तिसऱ्या स्थानी टीम डेविड ५६० चेंडू, चौथ्या स्थानी ट्रॅव्हिस हेड ५७५ आणि फिल साल्ट आहेत. या सर्व दिग्गजांना वैभवने मागे टाकत हा विक्रम आपल्या नावावर केला आहे. या बिहारच्या छोकऱ्याची बॅट इतक्या वेगाने आणि अचूक टायमिंग साधत खाली येते कि गोलंदाजांचा चेंडू पडतेक्षणीच वेगाने सीमापार होतो. 'सिक्सर किंग युवराजनेही कबूल केलंय कि त्याचीही बॅट एव्हढ्या भन्नाट वेगाने खाली येत नव्हती. अंडर १९ वर्ल्ड कप आणि यंदाची आयपीएल गाजवणाऱ्या १५ वर्षीय सूर्यवंशीने जगातल्या भल्या भल्या क्रिकेटर्सना आपल्या प्रेमात पाडलंय. मात्र माजी कर्णधार सुनील गावसकर आणि 'मास्टर ब्लास्टर' सचिन तेंडुलकर यांनी टीम इंडियाला मिळालेल्या या रत्नाची जोपासना करा, त्याला अनुभवाचे पैलू पाडा आणि जपा असा सल्ला बीसीसीआय आणि भारतीय क्रिकेट धुरिणांना दिलाय वैभवला कसोटीत उतरवण्याची घाई करू नका असा सल्ला सचिन तेंडुलकरने दिलाय.

आता भारतीय क्रिकेटचे हे युवा वैभव कसे सांभाळायचे याचा विचार बीसीसीआयने करायचा आहे. एक मात्र खरे हे भारतीय क्रिकेटला गवसलेले 'यंग ब्लण्डर' जागतिक क्रिकेटमध्ये आपला धमाका दाखवून देणार आहे. मात्र या वादळाचा वेग असाच राहो यासाठी बीसीसीआय आणि भारतीय क्रिकेट प्रशासकांनी वैभव सूर्यवंशीला जपायला हवे. कारण वैभवला लाभलेल्या जन्मजात नैसर्गिक आक्रमकतेला अनुभवाचे कोंदण चढवण्याचे काम त्याच्या प्रशिक्षकांना करायचे आहे. अंडर १९ आणि आयपीएलमध्ये सूर्यवंशीने आपला धडाका दाखवलाच आहे. त्याने यंदा अनेक दिग्गजांचे विक्रम आपल्या तुफानी खेळीने मोडले आहेत. ख्रिस गेलचा एका आयपीएल हंगामातील ५९ षटकारांचा विक्रम तब्बल १४ वर्षांनी मोडला गेला आहे. तो विक्रम मोडणारा वैभव नक्कीच टीम इंडियाचे वैभव बनून आपण सूर्यवंशी असल्याचे भविष्यात पुन्हा सिद्ध करेल हीच अपेक्षा आहे.

## गोपीनाथजी

लोकनेते गोपीनाथ
संघर्षाचे दुसरे नाव
निपजला हा हिरा
धन्य होई नाथ्रागाव

अकल्पित मृत्यूनेही
साधला त्याचा डाव
आपली प्रखर गरज
काळाने घातलाघाव

परपक्षी मित्रअधीक
असा लाघवीस्वभाव
घणघाती वक्तृत्वाचा
जनमानसावरप्रभाव

पुराव्यासहरोखठोक
प्रति पक्षा ना निभाव
टोळीयुद्ध है नामशेष
सरला गुन्हे प्रादुर्भाव

तळागाळातला नेता
कर्तृत्वातून दावे ठाव
ऊस तोड कामगारां
प्रद्युक्त करायं उठाव

साखरसम्राट शोभले
लाघवी मधुर स्वभाव
सत्ता येते परत जाते
कशा साठी हवी हाव

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# दारूचे अड्डे .... आजपर्यंत पोलिसांना दिसले नाहीत काय ?

पिंपरी चिंचवड व पुणे शहर परिसरात हातभत्तेच्या विषारी दारूमुळे तब्बल २४ व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे वृत्त वाचले. विषारी वायूमुळे हे मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. आता पोलीस दलातील अनेकांची चौकशी सुरु आहे.

या प्रकरणात पुणे शहर पोलीस दलातील तीन, पिंपरी चिंचवड पोलीस दलातील सहा, आणि राज्य उत्पादन शुल्क विभागातील एकूण तेरा जणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. आजपर्यंत एकूण २६



अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे. या घटनेमुळे २४ कर्मचाऱ्यांच्या कुटुंबावर दुःखाची कुऱ्हाड कोसळली आहे.

वास्तविक हे दारूचे शोधकार्य घटनेनंतर सुरु झाले आहे. ते घटने अगोदर जर कारवाई झाली असती तर लोकांचे प्राण तरी वाचले असते अनेक उपनगरात खुले आम दारूची विक्री चालू होती. हे दारूचे अड्डे कोठे आहेत ? हे वर्तमान पत्रात जाहीर झाले आहे. एकूणच लोकांना दिसते पण पोलिसांना दिसत नाही हे एक आश्चर्यच आहे.पोलिसांनी अगोदर कडक कारवाई केली असती तर सारेच उघडकीला आले असते हा जाब विरोधी आघाडीने शासनाला विचारला पाहिजे.

**– शांताराम वाघ, पुणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शहापूर बस आगारात चालकांचा सन्मान; अपघातमुक्त सेवेसाठी गौरव




**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.०२, शहापूर (ठाणे) :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त शहापूर बस आगारात १ जून रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात वर्षभर सुरक्षित आणि अपघातमुक्त सेवा बजावणाऱ्या चालकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. १ जून १९४८ रोजी राज्यात एसटीची पहिली बस धावली, त्या ऐतिहासिक दिवसाच्या स्मरणार्थ हा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी आगार व्यवस्थापक मानसी शेळके, सहाय्यक कार्यशाळा प्रमुख अतुल वाडीले आणि स्थानक प्रमुख हासिम नाजीम शेख यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमात युवराज देवकर, विजय घरत आणि रमाकांत देसाई या चालकांना त्यांच्या वर्षभरातील सुरक्षित, शिस्तबद्ध आणि अपघातमुक्त सेवेसाठी सन्मानित करण्यात आले.

यावेळी बोलताना आगार व्यवस्थापक मानसी शेळके यांनी चालकांचे कौतुक करत, प्रवाशांच्या सुरक्षित आणि विश्वासार्ह सेवेसाठी चालकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे सांगितले. कार्यक्रमादरम्यान एसटीच्या सेवाभावी परंपरेचा गौरव करण्यात आला. तसेच भविष्यात अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि प्रवाशाभिमुख सेवा देण्याचा संकल्प सर्व कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला.

## पंढरपूर दर्शनासाठी गेलेल्या वस्सा येथील वारकऱ्याचा अपघातात मृत्यू

**अक्षराज : जाफर शेख**

**दि.०२, बोरी :** वस्सा येथील वारकरी भजनी भगवान रामराव कुटे यांचा पंढरपूर येथे दर्शनासाठी गेले असताना झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे वस्सा गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भगवान रामराव कुटे हे दि.३१ मे रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी गेले होते. चंद्रभागा नदीवरील पुलाकडून मंदिराकडे जात असताना अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच मंगळवारी (दि.०२ जून) दुपारी सुमारे १२.३० वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. भगवान कुटे हे गावातील धार्मिक व वारकरी संप्रदायातील कार्यात सक्रिय सहभागी होत. त्यांच्या अकाली निधनाने गावात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन भाऊ, भावजया तसेच मोठा परिवार आहे. ते प्राचार्य गजानन कुटे व आरोग्य सहाय्यक बबन कुटे यांचे बंधू होत. त्यांच्यावर बुधवार (दि.०३ जून) रोजी सकाळी ९ वाजता वस्सा येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रपरिवार व वारकरी बांधवांकडून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

## ज्ञानोबा माऊलींच्या जयघोषाने तावशी नगरी दुमदुमली

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०३, पंढरपूर :** तालुक्यातील मौजे तावशी येथे अधिक मासानिमित्त आळंदी पुणे येथील श्री जोग महाराज यांची दिंडी पंढरपूर तालुक्यातील अनेक गावागावातून जात आहे या दिंडीची सुरुवात संत श्री नामदेव पायरी पासून सुरुवात होऊन नारायण चिंचोली येथून प्रारंभ झाला असून तालुक्यातील अनेक खेड्यापाड्यातून ही दिंडी जात आहे आज या दिंडीचे तालुक्यातील मौजे तावशी येथे आगमन झाले होते.

ग्रामस्थांच्या वतीने या दिंडीचे उत्साहात स्वागत करण्यात आले पंचायत समितीचे माजी उपसभापती उपसभापती पुरुषोत्तम पाटील यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. दर ३ वर्षांनी अधिक मासानिमित्त ही दिंडी आळंदी पुणे येथून निघत असते व पंढरपूर तालुक्यातील ग्रामीण भागातून फिरत असते अधिक मासानिमित्त लाखो भाविक पंढरपूर येथे येत असतात अनेक दिंड्या अनेक भाविक मोठ्या श्रद्धेने पूर्ण महिनाभर येथे येत असतात अनेक पूजाअर्चा या महिन्यात होत असतात. तर विठ्ठलाच्या पंचक्रोशीतील प्रदक्षिणा अधिक पुण्यवान असते असेही म्हटले जाते या महिन्यांमध्ये जितके पुण्य केले जाते त्याच्या अनेक पटीने त्याचे फळ मिळत असते म्हणून या अधिक मासाला पुण्यकाळ असेही म्हटले जाते.

या दिंडीचा समारोप तालुक्यातील पखालपूर येथे होत असून ५ जून रोजी संत श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर पंढरपूर येथे काल्याच्या कीर्तनाने सांगता समारंभ होणार आहे.यावेळी मारुती मंदिर येथे ग्रामस्थ उपस्थित होते तर दिंडी तील वारकऱ्यांना पुरुषोत्तम पाटील यांच्या वतीने अल्पपोहाराची सोय करण्यात आली होती. टाळ मृदुंगाच्या गजराने गावातील वातावरण भक्तिमय झाले होते.

## माधवराव पाटील महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, पालम (परभणी) :** विविध स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून शहरातील माधवराव पाटील महाविद्यालयातील आठ विद्यार्थी वेगवेगळ्या शासकीय सेवेत रुजू झाल्यामुळे त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने दि. २ जून रोजी सत्कार करण्यात आला. या सत्काराच्या निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थी, सय्यद आयेशा, श्रीकांत काळे, गणेश सोडगीर, वैजनाथ रोकडे, दिव्या कुरे, नर्सिंग हुलगिर, गोपाळ डुले, राधा हजारे, गायत्री सोळंके आणि गोदावरी पोळ या विद्यार्थ्यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक केंद्र आणि राज्य सरकारच्या परीक्षांची तयारी करून दैदिप्यमान यश मिळविल्यामुळे महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

हा सत्कार श्री बळीराजा शिक्षण संस्था सोमेश्वरचे अध्यक्ष भाई तुषार गोळेगावकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र दंत वैद्यकीय महाविद्यालय संघटनेचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य नारायणराव चौधरी, मा. विभागीय बोर्ड सदस्य केशवांना दुधाटे, माजी प्राचार्य गोपाळराव भुसारे आणि शिक्षक नेते वसंतराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते यशस्वितांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आत्माराम आरसुळे यांनी केले. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.एच.टी. सातपुते यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# पाणी, स्वच्छता, दारुबंदी अतिक्रमणावरुन मंद्रूप ग्रामसभा गाजली

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०२, सोलापूर :** मंद्रूप गावातील व हद्दवाढ भागातील पाणीपुरवठा, स्वच्छता, अवैध दारूविक्री, जिल्हा परिषद शाळेसमोरील अतिक्रमण तसेच विविध मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवरून मंद्रूपची ग्रामसभा सोमवारी चांगलीच गाजली. या सभेला ग्रामपंचायत सदस्य व उपसरपंच अनुपस्थित राहिल्याने संतप्त नागरिकांनी त्यांच्या खुर्चीला हार घालून निषेध व्यक्त केला. सरपंच अनिता कोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या ग्राम सभेला महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावातील पाणीटंचाई, विजेच्या भारनियमनामुळे विस्कळीत झालेला पाणीपुरवठा, स्वच्छतेची बिघडलेली व्यवस्था, गटारींची साफसफाई, रस्त्यांवरील घाणीचे ढीग, गावातील वाढते अतिक्रमण, अवैध दारूविक्री आणि विकासकामांचा रखडलेला वेग याबाबत उपस्थित नागरिकांनी सरपंच व ग्रामसेवकांना थेट प्रश्न विचारत जाब विचारला.

ग्रामसभेच्या सुरुवातीलाच अनेक नागरिकांनी लोकप्रतिनिधींच्या अनुपस्थितीचा मुद्दा उपस्थित केला. ग्राम सभेसारख्या महत्त्वाच्या बैठकीत सदस्य व उपसरपंच गैरहजर राहणे हे गावकऱ्यांप्रती असलेली उदासीनता दर्शवते, अशी भावना व्यक्त करण्यात आली. याच्या निषेधार्थ नागरिकांनी गैरहजर सदस्यांच्या रिकाम्या खुर्च्यांना हार घालून नाराजी व्यक्त केली.

**पाणीप्रश्नावर महिलांचा संताप**

महिलांनी पाणीटंचाईच्या प्रश्नावर तीव्र नाराजी व्यक्त केली. अनेक भागात नियमित व पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याने महिलांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

**➤ ग्रामपंचायतीचे आश्वासन**

ग्रामसभेत उपस्थित सरपंच व ग्रामसेवक यांनी नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देत पाणी, स्वच्छता, शौचालय अतिक्रमण आणि इतर प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. संबंधित विभागांशी समन्वय साधून समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे सरपंच कोरे यांनी सांगितले.

मात्र, ग्रामसभेत उपस्थित नागरिकांनी केवळ आश्वासनांवर समाधान व्यक्त न करता प्रत्यक्ष कामे झाली पाहिजेत, अशी ठाम भूमिका मांडली. गावाच्या विकासाशी संबंधित प्रश्नांवर लोकप्रतिनिधींनी अधिक जबाबदारीने काम करावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

विजेच्या भारनियमनामुळे पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक कोलमडत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. उन्हाळ्याच्या काळात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना वणवण भटकावे लागत असल्याचेही ग्राम सभेत नमूद करण्यात आले.

**स्वच्छतेच्या प्रश्नांवरून धरले धारेवर**

गावातील अनेक भागांमध्ये गटारी तुंबलेल्या असून नियमित साफसफाई होत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली. काही भागांत घाणीचे ढीग साचल्याने दुर्गंधी पसरत असून साथीच्या रोगांचा धोका निर्माण होत असल्याचे महिलांनी सांगितले. ग्रामपंचायतीने स्वच्छतेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामसभेत करण्यात आली.

**अवैध हातभट्टी दारू विक्रीवर कारवाईची मागणी**

ग्रामसभेत अवैध दारूविक्रीचाही प्रश्न जोरदारपणे उपस्थित करण्यात आला. गावातील काही भागांत तर पोलीस स्टेशनच्या शंभर मीटर अंतरावर खुलेआम दारूची विक्री होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. यामुळे युवक व्यसनाधीन होत असून सामाजिक वातावरण बिघडत असल्याची खंत युवकांनी व्यक्त केली. संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामसभेत करण्यात आली.

**जिल्हा परिषद शाळेसमोरील अतिक्रमणाचा मुद्दा**

जिल्हा परिषद शाळेसमोरील वाढत्या अतिक्रमणाचा प्रश्नही ग्रामसभेत चर्चेचा विषय ठरला. शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असून अतिक्रमणामुळे होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या हितासाठी अतिक्रमण केलेले पत्र्याचे शेड व चायनीज सेंटर अनेक दुकाने तातडीने हटविण्याची मागणी करण्यात आली.

### गैरहजर उपसरपंचाच्या खुर्चीला घातला हार




**विकासकामांबाबतही प्रश्नांचा भडिमार...**

ग्रामसभेत विविध विकासकामांचा आढावाही घेण्यात आला. मंजूर झालेली कामे वेळेत पूर्ण होत नसल्याबद्दल नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. गावातील रस्ते, पथदिवे, पाणीपुरवठा योजना, स्वच्छता मोहीम आणि इतर विकासकामांबाबत माहिती देण्याची मागणी करण्यात आली.

या ग्रामसभेला ग्रामपंचायत सदस्य शिवानंद लोभे, यासीन मकानदार, अंकिता कुंभार, शिवपुत्र जोडमोठे , दयानंद ख्याडे, सचिन फडतरे, रमेश कुंभार उमाशंकर रावत,बलराज माने, आप्पासाहेब व्हनमने,जाविद आवटे संतोष बरूरे, प्रमोद रणखाबे, सद्दाम शेख,मयांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाणी, स्वच्छता, दारूबंदी आणि अतिक्रमणाच्या प्रश्नांवर झालेली जोरदार चर्चा तसेच गैरहजर सदस्यांच्या रिकाम्या खुर्च्यांना हार घालून व्यक्त करण्यात आलेला निषेध हा संपूर्ण गावात चर्चेचा विषय ठरला आहे.

# रुपाली कासट मृत्यू प्रकरण : आत्महत्या की हत्या?

## संशयाच्या भोवऱ्यात तरुणीचा मृत्यू; निष्पक्ष चौकशीची मागणी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, कासा (पालघर) :** डहाणू तालुक्यातील धामटणे येथील २४ वर्षीय रुपाली सुरेश कासट हिच्या संशयास्पद मृत्यूमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. वाणगाव येथे ३० मे रोजी रुपाली गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. या प्रकरणी वाणगाव पोलिस ठाण्यात बी.एन.एस. कलम १९४ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असली, तरी हा आत्महत्येचा प्रकार नसून हत्या असू शकते, असा गंभीर आरोप व संशय कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष, सखोल व उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रुपाली सुरेश कासट (वय २४) ही मूळची धामटणे (ता. डहाणू) येथील रहिवासी होती. ती २०२४ पासून वाणगाव पश्चिम येथील तनिष्क गोल्ड बिल्डिंगमधील एका सुशिक्षित व नोकरदार दाम्पत्याकडे केअरटेकर म्हणून कार्यरत होती. संबंधित महिला शिक्षिका असून त्या एका आश्रमशाळेत कार्यरत असल्याचे सांगितले जाते, तर त्यांचे पती एका खासगी कंपनीत वरिष्ठ पदावर कार्यरत आहेत.

**प्रेमसंबंधांमुळे निर्माण झाला वाद?**

मृत रुपालीच्या कुटुंबीयांनी केलेल्या आरोपांनुसार, संबंधित शिक्षिकेचे त्याच शाळेतील एका सहकारी शिक्षकासोबत प्रेमसंबंध होते. हा व्यक्ती वारंवार त्यांच्या घरी येत असे. या संबंधांची माहिती संबंधित महिलेच्या पतीला मिळाल्यानंतर पती-पत्नीमध्ये वारंवार वाद होत होते.

कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, या वादांचे खापर रुपालीवर फोडण्यात आले. तूच आमच्या संबंधांबाबत माहिती दिलीस असा आरोप संबंधित महिला रुपालीवर करत होती. तसेच संबंधित शिक्षकाकडूनही रुपालीला धमकावले जात असल्याची माहिती तिने आपल्या कुटुंबीयांना दिली होती.

**मानसिक तणावाखाली असल्याचा दावा**

रुपाली ही शांत, मनमिळाऊ आणि जबाबदार स्वभावाची होती. ती घरातील मुलांचा सांभाळ, शाळेशी संबंधित कामे आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळत होती. संबंधित कुटुंबाचा तिच्यावर विश्वास होता. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून संबंधित महिलेचे रुपालीबाबतचे वर्तन बदलले होते आणि ती मानसिक तणावाखाली असल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

**२६ मे रोजी पुन्हा वाणगावला परतली...**



उन्हाळी सुट्ट्यांदरम्यान रुपाली दोन ते तीन वेळा आपल्या गावी आली होती. २३ मे रोजी ती धामटणे येथे आली होती. मात्र संबंधित व्यक्ती कंपनीच्या कामानिमित्त बाहेर जाणार असल्याचे सांगून तिला वारंवार फोन करून कामावर परत येण्यास सांगत होते. आर्थिक परिस्थिती आणि पूर्वी मिळालेल्या मदतीची जाणीव ठेवून रुपाली २६ मे रोजी पुन्हा वाणगाव येथे गेली होती.

**३० मे रोजी धक्कादायक माहिती**

३० मे रोजी सकाळी रुपालीच्या कुटुंबीयांना फोनद्वारे तिच्या मृत्यूची माहिती देण्यात आली. रुपाली राहत असलेल्या घरालगतच्या गॅलरीच्या स्लॅबला साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे सांगण्यात आले. मात्र घटनास्थळी पोहोचल्यानंतर परिस्थिती संशयास्पद वाटल्याने हा प्रकार आत्महत्या नसून हत्या असू शकते, असा तिघांविरोधात संशय कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे.

**फॉरेन्सिक पथकाची घटनास्थळी भेट**

घटनेची माहिती मिळताच वाणगाव पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा केला. त्यानंतर वरिष्ठ पोलिस अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी तसेच फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळी भेट देऊन पुरावे संकलित केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून अहवालाची प्रतीक्षा आहे.

**न्यायासाठी कुटुंबीयांची आर्त हाक**

रुपालीच्या मृत्यूमागील सत्य बाहेर यावे, दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि या प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे. सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार आणि नागरिकांनी या प्रकरणात लक्ष घालून रुपालीला न्याय मिळवून द्यावा, अशी भावनिक सादही त्यांनी घातली आहे.


दरम्यान, या प्रकरणातील आरोप आणि संशय हे कुटुंबीयांनी मांडलेल्या माहितीनुसार असून, मृत्यूचे नेमके कारण आणि वस्तुस्थिती पोलिस तपास, फॉरेन्सिक अहवाल व न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होणार आहे.

## गुंडगे डम्पिंग ग्राउंड विरोधात घनकचरा प्रकल्प हटाव संघर्ष समितीचा साखळी उपोषणाचा इशारा

**अक्षराज : जयेश जाधव**

**दि.०२, कर्जत (रायगड) :** कर्जत नगर परिषदेच्या हद्दीतील गुंडगे परिसरात सुरू असलेले डम्पिंग ग्राउंड पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले असून, स्थानिक ग्रामस्थांनी नगर परिषद प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सदरचे डम्पिंग ग्राउंड हटवण्याची मागणी जोर धरू लागली आहे गुंडगे परिसरातील नागरिकांनी आता एकत्रीत येऊन घनकचरा प्रकल्प हटाव संघर्ष समितीच्या माध्यमातून साखळी उपोषणाचा इशारा दिला आहे.

याबाबतचे लेखी निवेदन रायगडचे जिल्हाधिकारी, कर्जत तहसीलदार, मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद, कर्जत पोलिस



ठाणे यांना पाठविण्यात आले आहे. गुंडगे येथील टेकडीवर २००२मध्ये गांडूळ खत प्रकल्पासाठी ठराव करण्यात आला होता. कर्जत नगर परिषदेचा कचरा सुरुवातीला लाखरन हद्दीजवळ टाकण्यात येत होता. मात्र २०१२ नंतर गांडूळ खत प्रकल्पाच्या नावाखाली गुंडगे येथे मोठ्या प्रमाणात कचरा साठवण्यास सुरुवात झाली. कालांतराने हा प्रकल्प डम्पिंग ग्राउंडमध्ये रूपांतरित झाला असून, येथे सर्वत्र रस्त्यावर ओला आणि प्लॅस्टिक कचऱ्याचे मोठे ढीग साचले आहेत. त्यामुळे या परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच नगर परिषदेकडून देण्यात आलेल्या लेखी उत्तरात निधी उपलब्धता, दहिवली येथील जागा ताब्यात घेणे आणि घनकचरा प्रकल्पाचे विकेंद्रीकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. तरीही प्रत्यक्ष कामाला गती नसल्याने घनकचरा प्रकल्प हटाव संघर्ष समितीच्या माध्यमातून साखळी उपोषणाचा इशारा दिला आहे.

# वनजमिनीवर पक्के बांधकाम, तरीही कारवाई शून्य

## जिंतूर प्रशासनावर प्रश्नांचा भडिमार; शासनाच्या जागेवर भोंदूगिरी जोरात



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०२, जिंतूर (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील सुकळी ताठापूर परिसरातील वन विभागाच्या जमिनीवरील कथित अतिक्रमण प्रकरणाने आता गंभीर स्वरूप धारण केले असून, शासनाच्या आदेशानंतरही कारवाई होत नसल्याने महसूल प्रशासन, वन विभाग, ग्रामपंचायत आणि महावितरण विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, वन विभागाच्या जागेवर पक्के बांधकाम करून वास्तव्यास राहत असतानाही संबंधितांवर कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आलेली नाही.या प्रकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे कारण काही महिन्यांपूर्वी डॉक्टर असोसिएशनच्या वतीने सुकळी ताठापूर परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी तत्कालीन आमदार तथा पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी स्वतः घटनास्थळी भेट देऊन वनजमिनीवरील परिस्थितीची पाहणी केली होती. पाहणी दरम्यान त्यांनी अतिक्रमणाबाबत नाराजी व्यक्त करत तहसीलदार, नायब तहसीलदार, वन विभाग अधिकारी, वनपाल, तलाठी, ग्रामसेवक यांना तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले होते.मात्र, पालकमंत्र्यांच्या स्पष्ट निर्देशांनंतरही संबंधित प्रकरणात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे शासनाच्या आदेशालाच केराची टोपली दाखवली जात आहे का, असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. स्थानिकांच्या मते, जर सामान्य नागरिकाने शासनाच्या जमिनीवर अतिक्रमण केले असते तर तातडीने कारवाई झाली असती; मात्र या प्रकरणात प्रशासनाचे मौन अनेक शंका निर्माण करत आहे. या प्रकरणातील आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे संबंधित ठिकाणी महावितरणकडून वीजपुरवठा सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. वनजमिनीवरील कथित अनधिकृत बांधकामाला वीजजोडणी देण्यासाठी कोणती कागदपत्रे सादर करण्यात आली? वीजपुरवठा कोणत्या नियमांनुसार मंजूर करण्यात आला? संबंधित जागेचे मालकी हक्क तपासण्यात आले होते का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित परिसरात अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणारे प्रकारही वेळोवेळी समोर येत आहेत. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि प्रशासनाने याची दखल घेऊन आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मते, शासनाच्या जमिनीवर अतिक्रमण करून तेथे धार्मिक किंवा अंधश्रद्धेचे वातावरण निर्माण होत असेल तर भविष्यात सामाजिक तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.सुकळी ताठापूर व लिडज ग्रुप ग्रामपंचायतीच्या भूमिकेवरही आता प्रश्न उपस्थित केले जात आहेत. गावपातळीवर मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरू असताना ग्रामपंचायत प्रशासन, ग्रामसेवक आणि तलाठी यांनी वेळीच कारवाई का केली नाही, असा सवाल नागरिक विचारत आहेत. शासनाच्या जमिनीचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणांनीच दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. पर्यावरण प्रेमींच्या मते, वन विभागाच्या जमिनीवरील अतिक्रमण रोखण्यासाठी कठोर कारवाई न झाल्यास भविष्यात अशा घटनांमध्ये मोठी वाढ होऊ शकते. वनसंपत्तीचे संरक्षण करणे ही शासनाची प्राथमिक जबाबदारी असून, त्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आकाश पाटील बिनविरोध संचालक



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, देसाईगांव (ठाणे) :** ठाणे-पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीत ठाणे तालुका मतदारसंघातून युवा नेतृत्व आकाश बाबाजी पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. छाननीच्या दिवशी त्यांच्याविरोधात दुसरा अर्ज दाखल न झाल्याने त्यांना २ जून २०२६ रोजी विजयी घोषित करण्यात आले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, कल्याण तालुकाप्रमुख गोपाळ लांडगे आणि कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आकाश पाटील यांनी निवडणूक लढवली. त्यांच्या निवडीमुळे सहकार क्षेत्रात नव्या पिढीच्या नेतृत्वाला संधी मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

**पाटील घराण्याचा ४० वर्षांचा वारसा**

आकाश पाटील यांचे आजोबा स्व.बाळाराम कान्हा पाटील १९८६ ते २००८ पर्यंत बँकेचे ४ वेळा अध्यक्ष राहिले. वडील बाबाजी बाळाराम पाटील २००८ ते २०२६ पर्यंत संचालक आणि २ वेळा अध्यक्ष होते. आकाश पाटील यांच्या रूपाने पाटील कुटुंबाची तिसरी पिढी आता बँकेच्या कारभारात उतरली आहे.

उच्चशिक्षित आणि अभ्यासू असलेले आकाश पाटील आधुनिक व्यवस्थापन, वित्तीय नियोजन आणि विकासाभिमुख विचारांसाठी ओळखले जातात. युवकांशी असलेला थेट संपर्क आणि जनसामान्यांच्या प्रश्नांप्रती संवेदनशीलता यामुळे त्यांना सर्व स्तरांतून पाठिंबा मिळाला.

**ही निवड विश्वासाचा विजय**

निवडीबद्दल बोलताना आकाश पाटील म्हणाले, ही माझ्या वैयक्तिक यशाची निवड नसून ठाणे तालुक्यातील सभासद, शेतकरी आणि कार्यकर्त्यांनी दाखविलेल्या विश्वासाचा विजय आहे. बँकेला आधुनिक, पारदर्शक आणि लोकाभिमुख बनविण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने काम करेन.

युवा शक्ती, तंत्रज्ञान आणि सहकार यांचा संगम घडवून बँकेच्या प्रगतीला नवी दिशा देईन. त्यांच्या बिनविरोध निवडीमुळे आगामी काळात डिजिटल बँकिंग विस्तार, शेतकरी-केंद्रित धोरणे आणि युवकांना सहकारात संधी मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. आकाश पाटील यांच्या रूपाने ठाणे जिल्ह्याच्या सहकार क्षेत्राला ऊर्जावान आणि विकासाभिमुख नेतृत्व लाभले आहे.

# महाबळेश्वर आगारास नव्या 'राजमाता जिजाऊ' बसेसचे लोकार्पण



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०२, महाबळेश्वर :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त महाबळेश्वर आगारात १० नव्या 'राजमाता जिजाऊ' बसेसचे लोकार्पण उत्साहात पार पडले. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा महाबळेश्वर तालुक्याचे भूमिपुत्र एकनाथ शिंदे यांच्या विशेष प्रयत्नातून या बसेस महाबळेश्वर आगाराला उपलब्ध झाल्या आहेत .या नव्या बसेसमुळे प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

लोकार्पण सोहळ्याला एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बसेसचे पूजन करून हिरवा झेंडा दाखविण्यात आला.

नव्या बसेसमुळे महाबळेश्वर आगाराच्या ताफ्यात भर पडली असून ग्रामीण तसेच पर्यटन मार्गांवरील वाहतूक सेवा अधिक सक्षम होणार आहे. पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेल्या महाबळेश्वरमध्ये दरवर्षी मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असल्याने या बसेसचा फायदा प्रवासी आणि पर्यटकांना होणार आहे.

कार्यक्रमात एसटी कर्मचाऱ्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. तसेच भविष्यात प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी एसटी महामंडळ कटिबद्ध असल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले.नवीन बसेस अत्याधुनिक सोयी-सुविधांनी युक्त आणि आरामदायी आहेत. महाबळेश्वरच्या डोंगराळ घाटांच्या रस्त्यांवरून प्रवास करताना या नव्या गाड्यांमुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुखकर होणार आहे. या कार्यक्रमा दरम्यान ज्येष्ठ प्रवाशांच्या हस्ते केक कापून एसटी महामंडळाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा बँकेचे राजू शेठ राजपुरे, जिल्हा परिषद सदस्य अजित संकपाळ, पंचायत समिती सभापती शकुंतला चोरमले, उपसभापती संजय मोरे, शिवसेना पंचायत समिती सदस्य संजय शेलार महाबळेश्वर शिवसेना पक्षप्रमुख विजयभाऊ नायडू, आगार व्यवस्थापक महेश जाधव, सहायक वाहतूक अधीक्षक प्राजक्ता मोहिते, आगार लेखाकार महेश शिंदे, सहायक कार्यशाळा अधीक्षक जयवंत केदार, वाहतूक निरीक्षक शाहरुख खान यांची प्रमुख उपस्थिती होती. बसेस पुजन कार्यक्रमास सहायक वाहतूक निरीक्षक किरण धुमाळ,वरीष्ठ लिपिक विकास कांबळे, अजित जमदाडे, वाहतुक नियंत्रक विठ्ठल चव्हाण, संजय निकम, राहुल कुंभार, जयवंत जाधव,प्रशांत मिसाळ, संतोष ढेबे, अक्षय फडतरे, तालुका प्रमुख गणेश उतेकर,महाबळेश्वर शिवसेना प्रमुख विजयभाऊ नायडू, प्रवीण भिलारे, संभाजी भिलारे, जे.के. अंबराळे, सचिन गुजर, चंद्रकांत संकपाळ, राजू पंडित, गौरव राक्षे, उस्मान खांरखंडे, प्रकाश पाटील, सचिन कदम, राहुल साळुंखे, किरण मोरे, राजेंद्र पवार, वर्षा आरडे, मेघा चोरगे, सतीश ओंबळे, सुनील ढेबे, मंगल फळणे, सोनाली बांदल व सुनीता फळणे आदी उपस्थित होते.

# सोलापुरात दारूबंदीचा धडाका! अवैध हातभट्टीवर उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०२, पंढरपूर :** राज्य उत्पादन शुल्क विभाग, सोलापूर यांनी जिल्ह्यात अवैध हातभट्टी निर्मिती, मद्य विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम राबवत मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत २३ लाख ५६ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून ६४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विभागीय उपायुक्त, पुणे विभाग सागर धोमकर यांच्या निर्देशानुसार तसेच राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री पं. जाधव आणि उपअधीक्षक सौरभ बा. अदाटे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत सोलापूर शहर व जिल्ह्यात धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत ४३ हजार १७५ लिटर रसायन, ३ हजार ७८३ लिटर हातभट्टी दारू, १६.२ बल्क लिटर देशी मद्य, १५.६ बल्क लिटर बिअर आणि १२५ बल्क लिटर ताडी असा मोठा साठा जप्त करण्यात आला. तसेच ४७ जणांवर कारवाई करून ३ वाहनांसह एकूण २३.५६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क विभागाने हातभट्टी निर्मितीचे समूळ उच्चाटन करण्यावर भर दिला असून पोलीस विभाग व इतर यंत्रणांच्या समन्वयाने संयुक्त कठोर कारवाया करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. अवैध मद्य विक्री, निर्मिती किंवा वाहतुकीसाठी जागा उपलब्ध करून देणाऱ्या मालकांनाही आरोपी करण्यात येत असल्याची माहिती विभागाने दिली. दरम्यान, मिथेनॉलयुक्त बनावट दारूमुळे पुण्यात घडलेल्या दुर्घटनेचा संदर्भ देत नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अशा विषारी दारूमुळे किडनी निकामी होणे, कायमस्वरूपी अंधत्व येणे व अकाली मृत्यू यांसारखे गंभीर परिणाम संभवतात, असे विभागाने स्पष्ट केले. अवैध मद्यनिर्मिती, विक्री, वाहतूक किंवा मिथेनॉल, क्लोरेल हायड्रेट यांसारख्या पदार्थांच्या वापराबाबत माहिती असल्यास नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९ किंवा व्हॉट्सअॅप क्रमांक ८४२२००११३३ वर तात्काळ माहिती द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी सांगितले.

## थोडक्यात

### अधिक मासानिमित्त खांबाळपाड्यात नवनाथांसह श्रीकृष्ण, दत्तगुरूंच्या प्रतिमा ठेवून महापूजा



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, डोंबिवली (ठाणे) :** मंगळवार, दिनांक ०२ जून २०२६ रोजी सकाळी अधिक मासाच्या पवित्र पर्वावर डोंबिवली खांबाळपाडा येथे मंगळवार, ०२ जून २०२६ रोजी सकाळी भक्तिभावाने महापूजेचा सोहळा संपन्न झाला. मुक्ता भोईर यांच्या निवासस्थानी नवनाथ, श्रीकृष्ण, दत्तगुरू, विष्णू, भोलेनाथ या सर्व देवतांच्या प्रतिमा ठेवून विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली.

फुलांनी सजवलेल्या मंडपात सर्व देवतांच्या तसबिरींसमोर कलश मांडणी, नैवेद्य, तुपाचे दिवे लावून धार्मिक विधी पार पडले. या प्रसंगी नवनाथ ग्रंथाचे नऊ दिवस न चुकता पारायण करण्यात आले. ग्रंथातील ४० अध्यायांचे वाचन मुक्ता नामदेव भोईर यांच्या सुने आरती विशाल भोईर हिने दररोज केले.

कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे उपस्थित सर्व सुवासिनी जोडप्यांची ओटी भरण्यात आली. पारंपरिक पद्धतीने अक्षता, साडी, हळद-कुंकू आणि भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. पूजेनंतर उपस्थित सर्व भाविक-भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वांनी एकोप्याने महाप्रसादाचा लाभ घेतला. अधिक मासातील या भक्तिमय आयोजनामुळे खांबाळपाडा परिसरात आनंदाचे वातावरण होते. मुक्ता नामदेव भोईर यांनी सर्वांचे आभार मानले.

### धानोरे परिसरातील भंगार गोदामास भीषण आग



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, धानोरे (पुणे) :** मंगळवार दिनांक २ जून २०२६ रोजी सायंकाळी ४:४० वाजण्याच्या सुमारास धानोरे फाट्यापासून धानोरे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या एका भंगार गोदामाला भीषण आग लागल्याची माहिती प्राप्त झाली. सदर गोदाम हे बबलू तिवारी यांच्या मालकीचे असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भंगार साहित्य साठवलेले होते.

प्राथमिक माहितीनुसार, शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आगीची माहिती चोवीसावडी अग्निशमन केंद्राकडून प्राप्त झाल्यानंतर तात्काळ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या.

आग आटोक्यात आणण्यासाठी सुमारे साडेतीन तासांचे अथक प्रयत्न करावे लागले. आगीमध्ये संपूर्ण भंगार गोदाम जळून खाक झाले असून एक आयशर मालवाहू वाहन व एक मोटारगाडी देखील पूर्णपणे जळून नष्ट झाली आहे. तसेच मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा जळाल्यामुळे परिसरात दाट धुराचे लोट पसरले होते.

### संशोधनातून उलगडले चंद्रपूरचे मूळ 'बोर' गाव

#### १० हजार वर्षापूर्वीच्या अवशेषांचा शोध



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** चंद्रपूर शहराचा इतिहास केवळ गोंड राजापुरता मर्यादित नसून ते ५० हजार वर्षापूर्वीच्या पाषाणयुगीन आदिमानवाचे मुख्य केंद्र होते, हे एका ताज्या संशोधनातून समोर आले आहे. चंद्रपूर येथील प्रसिध्द इतिहास अभ्यासक आणि संशोधक प्रा. सुरेश चोपणे यांनी इराई आणि झरपट नदीच्या संगमाजवळ, पूर क्षेत्राच्या बाहेर एका अत्यंत प्राचीन आणि काळाच्या पडद्याआड गेलेल्या गावाचा शोध लावला आहे. 'बोर' (सध्याचे बोर रिठ) असे या नष्ट झालेल्या मूळ गावाचे नाव आहे.

या गावाच्या परिसरात प्रा. चोपणे यांना तब्बल १० हजार वर्षापूर्वीची पाषाणयुगीन अवजारे, ३ हजार वर्षापूर्वीच्या दगडाच्या वस्तू, २ हजार वर्षापूर्वीची मडकी, प्राण्यांची हाडे, दात आणि लेह वितळवण्याच्या भट्टीचे अवशेष आढळले. यावरुन हे गाव सातवाहन, वाकाटक आणि यादव अशा विविध कालखंडाचे साक्षीदार असल्याचे सिध्द होते. स्थानिक शेतकरी याला 'गवळी गाव' समजत असले, तरी पूर्वी एक भव्य मंदिर होते, ज्यांचे दोन शिवलिंग आणि इतर अवशेष आजही विखुरलेले आहेत. काही वर्षापूर्वी येथे प्राचीन नाणी व अलंकारही सापडले होते. सध्या घरांचे अवशेष ढिगाऱ्याखाली गाडले गेल्याने तिथे टेकडी तयार झाली असून, अधिक उत्खनन केल्यास मोठे ऐतिहासिक पुरावे हाती लागू शकतात, असा विश्वास प्रा. चोपणे यांनी व्यक्त केला आहे.

**नद्यांच्या काठी बहरली संस्कृती :** प्राचीन काळी बारमाही नद्यांच्या शेजारीच मानवी वस्त्या वसल्या हेत्या. आजच्या चंद्रपूर शहराच्या इतिहासात इराई आणि झरपट नद्यांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे.

**पाषाणयुगीन वस्ती :** दाताळा, नागाळा, देवाडा आणि आरवट हे क्षेत्र देशातील सर्वात मोठे पाषाणयुगीन स्थळ आहे. यानंतर झरपट नदीजवळील पापामिया टेकडी (सध्याचे मेडिकल कॉलेज परिसर) हे दुसऱ्या क्रमांकाचे मोठे पाषाणयुगीन स्थळ असून, तिथे शिवलिंग आणि हत्तीचे शिल्प सापडले आहे.

**प्राचीन गावे :** इराई नदीजवळ आजच्या आरवट गावाजवळ, होमिओपॅथी कॉलेज परिसर आणि पठाणपुरा गेटपासून अवघ्या १.२ किमी अंतरावर हे ' बोर रिठ' गाव आहे. याशिवाय संगमाजवळ 'माना' नावाचे गाव होते. आजचे लालपेठ व बाबूपेठ म्हणजेच हिंदू काळातील 'लोकपूर' व 'इंदूपूर' असावे, असा अंदाज आहे. गोंड राजाच्या पूर्वकाळात भद्रावती आणि भटाडा ही मोठी व्यापारी केंद्रे होती.

**सातवाहन ते ब्रिटिश काळ :** प्रा. सुरेश चोपणे यांच्या मते, चंद्रपूरच्या परिसरातील प्राचीन गावांवर अनुक्रमे सातवाहन, वाकाटक आणि यादव राजांचा प्रभाव होता. त्यानंतर इसवी सन १० व्या शतकानंतर वणी आणि चांदा (चंद्रपूर) परिसरातील ' राजगोंड' समाजाने आपली सत्ता स्थापन केली. ही सत्ता शिरपूर, बल्लारपूर ते चंद्रपूर अशी विस्तारत गेली. पुढे नागपूरच्या भोसले राजांनी आणि शेवटी इंग्रजांनी चंद्रपूरवर राज्य करत शहराचा विकास केला.